<u>PRESS NOTE</u>

## थेऊर फाट्याजवळ रासायनिक वायूगळतीचा थरार; पीएमआरडीए अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला!

### – पुणे-सोलापूर महामार्गावरील घटना; –मोनो मिथाईल अमाईन'च्या उग्र वासाने परिसरात घबराट!

पुणे: पुणे-सोलापूर महामार्गावरील थेऊर फाट्याजवळ बुधवारी (दि. ४) सकाळी सुमारे १०:४० वाजता रासायनिक वायू वाहून नेणारा टँकर रस्त्यालगतच्या मऊ मातीत रुतल्याने वायूगळतीची घटना घडली. टँकरमध्ये ४० टक्के 'मोनो मिथाईल अमाईन' (Monomethylamine — MMA) हा अत्यंत ज्वलनशील व धोकादायक वायू असल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणल्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

सोलापूरहून पुण्याकडे येणारा हा टँकर थेऊर फाट्याजवळ आला असता चालकाचे नियंत्रण सुटले आणि तो महामार्गालगतच्या मऊ मातीत खोलवर रुतला. या धक्क्यामुळे टँकरच्या मुख्य व्हॉल्व्हमधून वायूची गळती सुरू झाली. काही वेळातच रसायनाचा उग्र वास परिसरात पसरल्याने वाहनचालक व स्थानिक नागरिकांमध्ये घबराट पसरली.

घटनेची माहिती मिळताच, वाघोली अग्निशमन केंद्राचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. टँकरमधील रसायनाचे घातक स्वरूप लक्षात घेता परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता होती. अग्निशमन दलाने प्रथम गळती रोखण्यासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना केल्या; त्यानंतर हायड्रा क्रेनच्या साहाय्याने अत्यंत सावधगिरीने टँकर बाहेर काढण्यात आला. या जलद व समन्वयित कारवाईमुळे महामार्गावरील वाहतूक दीर्घकाळ विस्कळीत न होता परिस्थिती पूर्वपदावर आली.

---

***"वाघोली अग्निशमन केंद्रास माहिती मिळताच आमचे पथक तातडीने रवाना झाले. रसायनाची गळती होत असल्याने धोका अधिक होता; मात्र जवानांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे मोठी हानी टाळता आली."***

***¬ देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी, पीएमआरडीए.***

---

**मा. संपादक/ प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिक, वृत्तवाहिनी व डिजिटल मीडियातून प्रसिद्धीस द्यावे, ही विनंती.

**पुरुषोत्तम सांगळे**

माहिती व जनसंपर्क अधिकारी,

पीएमआरडीए, पुणे.